मॉरिशस दौऱ्यावर रवाना होण्यापूर्वी पंतप्रधानांचे निवेदन (10 मार्च 2025)

10 मार्च 2025

माझे मित्र पंतप्रधान डॉ.नवीनचंद्र रामगोलम यांच्या आमंत्रणाला प्रतिसाद देत मी मॉरिशसच्या 57 व्या राष्ट्रीय दिनानिमित्त आयोजित सोहळ्यात सहभागी होण्यासाठी दोन दिवसांच्या मॉरीशस दौऱ्यासाठी रवाना होत आहे.

मॉरिशस आपल्या नजीकचा सागरी शेजारी देश असून हिंदी महासागरातील महत्त्वाचा भागीदार तसेच आफ्रिका खंडाकडे जाण्याच्या मार्गावरील प्रवेशद्वार आहे. आपले देश इतिहास, भूगोल आणि संस्कृती यांच्या माध्यमातून जोडलेले आहेत. परस्परांवरील दृढ विश्वास, लोकशाहीच्या मूल्यांवरील सामायिक श्रद्धा आणि आपल्या वैविध्याचा उत्सव हे आपले सामर्थ्य आहे. परस्परांवरील दृढ विश्वास, लोकशाहीच्या मूल्यांवरील सामायिक श्रद्धा आणि आपल्या वैविध्याचा उत्सव हे आपले सामर्थ्य आहे. लोक केंद्रित उपक्रमांसह गेल्या दहा वर्षांत आपण लक्षणीय प्रगती केली आहे.

आमच्या SAGAR या संकल्पनेचा भाग म्हणून दोन्ही देशांतील जनतेच्या प्रगतीसाठी आणि समृद्धीसाठी तसेच हिंदी महासागर क्षेत्रातील सुरक्षितता आणि विकासासाठी आमची भागीदारी तिच्या सर्व आयामांच्या बाबतीत उंचावणे तसेच आमची शाश्वत मैत्री आणखी बळकट करणे या उद्देशासह मॉरिशसच्या नेतृत्वाशी संवाद साधण्याची संधी मिळण्याची मी उत्सुकतेने वाट पाहत आहे.

ही भेट भूतकाळाच्या मजबूत पायावर आधारलेली असेल आणि याद्वारे भारत-मॉरिशस मैत्रीचा नवा तसेच अधिक उज्ज्वल अध्याय सुरु होईल असा विश्वास मला वाटतो.

नवी दिल्ली

10 मार्च 2025